## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष
## निशाणी क्र. १५ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | अनिल दादाभाई धनगर |
| वय | – | ३१ वर्षे, |
| व्यवसाय | – | पो.हे.कॉ ब. क्र. १७४८, |
| सध्या नेमणुक | – | दोंडाईचा पोलीस स्टेशन, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दि. ३०.१२.२०२२ मी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे पोकॉ. या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस स्टेशन येथे मी, पोसई शरद लेंडे, पोना. प्रेमराज पाटील व पोकॉ. हिरालाल सुर्यवंशी असे हजर होतो. त्यावेळेस पोनि. दुर्गेश तिवारी यांना गुप्त बातमी मिळाली की, विखरण येथे हॉटेल महालक्ष्मी मागे क इसम देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री करतो. त्यावर पोऊनि. शरद लेंडे यांनी दोन पंचाना बोलावुन बातमीची हकीकत सांगितली. त्यावर ते दोघे पंच म्हणुन येण्यास तयार झाले. त्यावर आम्ही सरकारी वाहनाने दोंडाईचा येथुन विखरण गावाकडे रवाना झालो.

०२. त्यानंतर विखरण गावाच्या अलीकडे आम्ही आमचे सरकारी वाहन थांबवुन बातमीच्या ठिकाणी पायी गेलो. त्याठिकाणी तेथे एक इसम पांढरी पिशवी घेवुन आम्हाला दिसुन आला. आम्हाला बातमीची खात्री झाल्याने आम्ही तेथे छापा टाकला. सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप अशोक पाटील असे सांगितले. त्याच्या कब्जयातील मुद्देमाल म्हणजेच ऑफीसर्स चॉईसच्या १८० मि.ली. मापाच्या ५ बाटल्या आम्ही जप्त केल्या. त्यातुन एक बाटली नमुन्याकरीता सिलबंद केली. तसेच उर्वरित मुद्देमाल पोलीस स्टेशन येथे जमा केला. मी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आली) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तिच आहे. सदर फिर्यादीवर माझी सही आहे. सदर फिर्यादीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (करिता सदर फिर्यादीस **नि.क्र.२४** देण्यात येते.) मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी आज रोजी

न्यायालयासमोर हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. व्ही. तायडे यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल महालक्ष्मी हे जेवणाचे हॉटेल आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या आजुबाजूला व समोर रहिवासी वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी अनेक गाडया जेवणासाठी थांबतात. फिर्याद देण्यापुर्वी मी सदर हॉटेल कोणाचे मालकीची आहे त्याचा तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर हॉटेल गावाला लागुनच आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत. माझ्यासमक्ष पंटर पाठवुन बातमीची खात्री करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल बाटल्यांचा बॅच क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्टेशन डायरीमध्ये छाप्याचे कामी जात असल्याबाबतची नोंद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सदर नोंदीचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची आजुबाजूच्या खेडयावर पेट्रोलिंगकरीता डयुटी असते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पेट्रोलिंग करीता गेलो असता सदर हॉटेल मालकाकाडून जेवणाची मागणी केली व त्यास त्याने नकार दिल्याने त्याच्याविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालाशी आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी मुद्देमाल दाखवुन आरोपीविरुध्द दाखवुन खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान केलेली सर्व कथने ही खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नदीम व राम हे आमचे नेहमीचे पंच असुन आम्ही सांगु तेव्हा पोलीस स्टेशन येथे येवुन ते सहया करीत असतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा वर नमुद घटनेशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.03.17 17:33:23 +0530

दिनांक : १७/०३/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – जी. एस. अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – १७.०३.२०२६. |

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)